डॉ. विलास ने. शिंदे
कुलसचिव
Dr. V. N. Shinde
Registrar

Estd : 1962
'A++' Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४
SHIVAJI UNIVERSITY,
Vidyanagar, Kolhapur - 416 004

दूरध्वनी : कार्यालय – (०२३१) २६०९०६३
मोबा. : ९६७३७८४४००
Tel. : Office - (0231) 2609063
Mob. : 9673784400
E-mail : registrar@unishivaji.ac.in
Web : www.unishivaji.ac.in

अ.क्र. शिवाजी वि/आर/207
दिनांकः 16 नोव्हेंबर, 2023

प्रति,

प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये व
संचालक, मान्यताप्राप्त शिक्षण संस्था

महोदय/महोदया,

शिवाजी विद्यापीठाचा 60 वा पदवी प्रदान समारंभ डिसेंबर, 2023 मध्ये आयोजित करण्यात येत आहे. सदर समारंभात विद्यापीठाने आयोजित केलेले महत्वपूर्ण कार्यक्रम, महाविद्यालये तसेच विद्यापीठाच्या पदव्युत्तर अधिविभागातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी संपादन केलेल्या विशेष कार्याची ठळक नोंद मा. कुलगुरूंच्या वार्षिक अहवाल वाचनात केली जाते. सबब खालील मुद्दे विचारात घेऊन आपल्या महाविद्यालयात दिनांक 1 एप्रिल, 2023 ते 25 नोव्हेंबर, 2023 अखेर संपन्न झालेल्या/ आयोजित केलेल्या महत्वपूर्ण शैक्षणिक घडामोडींचा व संपादन केलेल्या विशेष कार्याबद्दलचा संक्षिप्त अहवाल आपण सादर करावा.

1. राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्वपूर्ण चर्चासत्रे/परिषद/कार्यशाळा
2. नवीन संशोधन प्रकल्पांची सुरुवात/वित्तीय संस्थांकडून मिळालेले अनुदान (एम.फिल. /पीएच.डी. च्या विद्यार्थ्यांनी हाती घेतलेल्या प्रकल्पांचा समावेश करण्यात येऊ नये.)
3. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिध्द झालेली संशोधन प्रकाशने (पुस्तके/ संशोधन प्रबंध आणि संशोधनपर लेख) संशोधनपर लेखाबद्दल तपशील देताना जर्नलचे नांव, प्रसिध्दीचे स्थळ, आवृत्ती क्रमांक, प्रसिध्दीचे वर्ष व पान क्रमांक इ. माहिती नमूद करावी.
4. शिक्षक, संशोधक विद्यार्थी व इतर विद्यार्थी यांना मिळालेले राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील सन्मान, पुरस्कार व पेटंट्स इ.
5. राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवरील सामंजस्य करार (MoU)
6. उपरोक्त मुद्यांव्यतिरिक्त आपल्या महाविद्यालयाने केलेल्या विशेष कार्याबद्दलचा तपशील **(Sports, NCC, NSS, Cultural Activities, Extra-curricular activities etc.)**
7. नॅक, एन.आय.आर.एफ. तथा तत्सम राष्ट्रीय संस्थांचे मानांकन

सदर माहिती दिनांक 30 नोव्हेंबर, 2023 पर्यन्त ईमेलने **vcoffice@unishivaji.ac.in** पाठवावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. व्ही.एन. शिंदे)
कुलसचिव